आचारसंहिता व शिस्तीसंबंधीच्या सूचना

०१. विद्यार्थ्यांची प्रत्येक विषयासाठी ७५ % उपस्थिती बंधनकारक आहे. कमी उपस्थिती असल्यास विद्यापीठ परीक्षेचा फॉर्म नाकारला जाईल व दंडात्मक कार्यवाही केली जाईल.

०२. वर्ग, कार्यक्रम व महाविद्यालयाच्या परिसरात विद्यार्थ्यांनी सुयोग्य वर्तणूक राखावी.

०३. आपले ओळखपत्र रोज स्वतःकडे बाळगावे व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विचारणा केल्यास सादर करावे.

०४. प्राचार्यांच्या पूर्व परवानगीशिवाय महाविद्यालयात कोणताही कार्यक्रम आयोजित करता येणार नाही व संघटना स्थापन करता येणार नाही.

०५. विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात शांतता व स्वच्छता राखावी.

०६. विद्यार्थ्यांनी स्वतःजवळ जीवित व संस्थेच्या मालमत्तेस नुकसान पोहोचणारे कोणतेही हत्यार, स्फोटक वस्तू व विषारी पदार्थ बाळगणे तसेच मादक पदार्थ, तंबाखू, गुटखा इत्यादी सेवन करणे गंभीर गुन्हा समजण्यात येईल व शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल.

०७. महाविद्यालयात मोबाईल वापरण्यास बंदी राहील.

०८. परिस्थितीनुसार नवीन नियम लागू करण्याचे सर्व अधिकार महाविद्यालयाकडे राहतील. सदरील नवीन नियमांचे पालन हे विद्यार्थी-विद्यार्थिनींना पालन करणे बंधनकारक राहील.

०९. प्रवेशासाठी येणारा विद्यार्थी यापूर्वी रॅगिंग करण्यामध्ये गुंतलेला असेल तर त्याला प्रवेश नाकारण्यात येईल वा प्रवेश दिल्यानंतरही असे निदर्शनास आले की, सदर विद्यार्थी रॅगिंग करण्यामध्ये गुंतलेला होता तर त्याला निष्कासित करण्यात येईल.

प्र. प्राचार्य
गोविंदलाल कन्हैयालाल जोशी (रात्रीचे)
वाणिज्य महाविद्यालय, लातूर

Special Courses

## शिक्षणाबरोबरच टॅली, पेजमेकर कोर्सेसची सुविधा..

महाविद्यालयातील व इतर विद्यार्थ्यांना टॅली, पेजमेकर आदी सॉफ्टवेअरचे ज्ञान अवगत व्हावे यासाठी महाविद्यालयाच्या संगणक विभागाच्या वतीने उपरोक्त दोन्ही कोर्स सवलतीच्या दरात शिकविण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे. महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना सदर कोर्स हे अत्यल्प दरात शिकविले जातात.